जनसंपर्क कक्ष
07 FEB 2023 क्रांतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा १६ रोजी दीक्षान्त समारंभ

कोल्हापूर(प्रतिनिधी):-शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ गुरुवारी,१६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या समारंभाला राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब केले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक आज झाली. यामध्ये व्यवस्थापन परिषदेवरील नूतन सदस्य उपस्थित होते. बैठकीत दीक्षान्त समारंभ १६ला घेण्याचे निश्चित केले. तसेच या समारंभात किती विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र द्यायचे, याचाही निर्णय झाला. राज्यपाल कोश्यारी यांच्यासह डॉ. सहस्त्रबुद्धे यांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्याला असणार आहे. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे हे राज्यसभेचे माजी खासदार असून इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन या संस्थेचे अध्यक्ष आहेत. ते ज्येष्ठ राजकीय विचारवंत असून भारताची सौम्य संपदा (सॉफ्ट पॉवर) याबद्दलची मांडणी त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर केली आहे. व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ वी एन शिंदे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते

लोकमत

# विद्यापिठातील ३,१६८ विद्यार्थ्यांनी दिल्या परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील १६ पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा शुक्रवारी वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण ३,१६८ विद्यार्थी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रात शुक्रवारी बीएस्सी, बीसीए, बीएबीएड, बीटेक, एमए, एमकॉम, एमएस्सी, एमबीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, डिप्लोमा इन टॅक्सेशन, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, रिअल इस्टेट, अशा एकूण १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या.

**वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर**

दि. २, ३, ४ फेब्रुवारी रोजी स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांना सोमवारपासून प्रारंभ करण्यात येणार आहे. बीकॉम भाग एकच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा प्रारंभी घेण्यात येणार असून, त्याबाबतचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंग जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठातील 'बेटी बचाओ अभियान' पथनाट्य स्पर्धेत १५ संघांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात कार्यरत बेटी बचाओ अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी पथनाट्य स्पर्धा घेण्यात आली.

स्त्री भ्रूणहत्या, स्त्री सबलीकरण, स्त्री शिक्षण व स्त्रियांचा समाजातील दर्जा या विषयावर पथनाट्य स्पर्धा होती.

प्रास्ताविक बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा बी. देसाई यांनी केले. स्पर्धेत १५ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

पुण्यनगरी

# 'स्तुती'ने शिवाजी विद्यापीठाचा वाढला लौकिक : प्रा. सोनकवडे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्तुती टीमच्या अथक परिश्रमाने शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक वाढला आहे. एकूण २२ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये एकूण १ हजार पेक्षा जास्त संशोधक विद्यार्थी, शिक्षक आणि औद्योगिक कर्मचाऱ्यांना या कार्यक्रमांचा लाभ मिळाला, अशी माहिती प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, शिवाजी विद्यापीठ आणि विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रमाला एक वर्ष पूर्ण झाले. या कार्यक्रमाला दि. ९ फेब्रुवारी रोजी मान्यता मिळाली होती. देशभरातून केवळ १३ संस्थांना प्रकल्प व्यवस्थापन केंद्र केले. शिवाजी विद्यापीठला याचा मान मिळाला, तसेच २.२५ कोटींचा निधी मंजूर झाला.

प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच डॉ. के. डी. पवार आणि डॉ. टी. डी. डोंगळे यांच्या सहयोगाने देशभरात क्रमाने काश्मीर, वेल्लोर, नांदेड, जोधपूर, लखनऊ, गोवा, केरळ, पाँडिचेरी, मंगळूर, दार्जिलिंग, गुवाहाटी, नागपूर, बडोदा, इंदोर, उडुपी, अमरावती, धारवाड, तिरुपती अशी १८, तर शिवाजी विद्यापीठाच्या सैफ केंद्रात ४ असे एकूण २२ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले.

पुण्यनगरी

# विद्यापीठात पथनाट्य स्पर्धा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या बेटी बचाओ अभियानाअंतर्गत पथनाट्य स्पर्धा घेण्यात आली. शिवाजी विद्यापीठ अधिविभागांतील व शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ बहुउददेशीय सभागृहात स्पर्धा झाली. या स्पर्धा स्त्री भ्रूणहत्या, स्त्री सबलीकरण, स्त्री शिक्षण व स्त्रियांचा समाजातील दर्जा या विषयांवर झाली. प्रास्ताविक समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. शिवाजी विद्यापीठ अधिविभागांतील व संलग्नित महाविद्यालयांतील मिळून पंधरा संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला.